सन २०१९-२० करीता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत प्राप्त निधी वितरणास मान्यता व कार्यारंभ आदेश देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः केंद्रिय-२०१९/प्र.क्र.६३/का.-१९**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २९/०६/२०१९

वाचा -

१. जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०१/२०१९-Grants, दि.११/०३/२०१९.
२. जनजाती कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र F.No.१८०१५/०४/२०१९- Grant दि. ३०/०५/२०१९
३. जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.१८०१५/०९/२०१९-EMRS, दि.३०/०५/२०१९

प्रस्तावना (Preamble) -

भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) योजनेअंतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आले होते. सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली येथे प्रकल्प मुल्यमापन समितीची (Project Appraisal Committee-PAC) बैठक दि. १२.०२.२०१९ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीच्या वाचा क्र. १ वरील इतिवृत्तान्वये केंद्र शासनाने एकुण रु. १५१८४.२९ लक्ष निधीच्या प्रस्तावांना मान्यता प्रदान केलेली आहे. यापैकी केंद्र शासनाने वाचा क्र. २ व ३ वरील पत्रान्वये रु. ३०९७.०३ लक्ष निधी वितरीत केला आहे. सदर रु. ३०९७.०३ लक्ष इतका निधी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय (Government resolution)-

केंद्र शासनाने सन २०१९-२० करिता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत मंजूर एकूण रु. १५१८४.२९ लक्ष (रु. एकशे एकावन्न कोटी चौ-याऐंशी लक्ष एकोणतीस हजार फक्त) निधीमधून पुढील कामांकरीता तालिकेतील स्तंभ क्र. ५ मध्ये दर्शविलेल्या निधीच्या मर्यादेत रू.३०९७.०३ लक्ष (रु. तीस कोटी सत्त्याण्णव लक्ष तीन हजार फक्त) खर्च करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | योजनेचे ठिकाण / योजना राबविणारी यंत्रणा (PO/ATC/संस्था) | सन २०१८-१९ करीता मंजूर निधी (रु.लाखात) | वितरीत करण्यात येणारा निधी (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|
| Committed Liability | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | Establishment of Warali Haat (Manor, Palghar) | Manor Palghar/ PO ITDP Jawhar | १०००.०० | २०३.९६ |
| २ | Upgradation and modernization of Ashram School Kitchens ( ३ lac @ AS for ATC Amravati and Nagpur ) | ATC Amravati and ATC Nagpur | ५१५.०० | १०५.०४ |
| ३ | Health care for Ashram Schools and EMRS (Digitized health records, MIS and Command Centre) | Commissionerate /Ameya Life | ५६१.०० | ११४.४२ |
| ४ | Organizing FPOs of १५००० farmers for processing, distribution, branding and retailing. | TRTI/TDC | १४४०.०० | २९३.७१ |
| ५ | Tribal Training Institute | TRTI | १५००.०० | ३०५.९४ |
| ६ | Creation of Monitoring and tracking softwares for Central Assistance schemes, Anudanit Schools, Aided Schools, EMRS, Nucleus Budget and Thakkarbappa | TRTI | ५००.०० | १०१.९८ |
| ७ | Data Analytics Centre | TRTI /Pune University | १००.०० | २०.४० |
| ८ | Benchmark survey and Developing Tribal Development Index | TRTI | २५०.०० | ५०.९९ |
| ९ | Bharat Rural Livelihoods foundation- Improving livelihood conditions by augmentnig land and water resources, sustainable agri practices, enhancing livestock productivity, capacity building of GPs for IFR/CFR and convergence of government schemes. | Commissionerate/ Chandrapur Gondia Gadchiroli Yavatmal/ BRLF | १००.०० | २०.४० |
| १० | Stri Shakti- establishment and operation of १५ semi automated central kitchens | Commissionerate/ PO ITDP Taloda, Nashik, Dahanu, Yawal, ,Kinvat/ Stri Shakti | ९४५.६२ | १९२.८७ |
| ११ | Stri Shakti - establish and run Central kitchen | Commissionerate/ PO ITDP Kalwan (२), Dhule,Pandharkawada /Stri Shakti | १३२४.४१ | २७०.१३ |

| अ.क्र. | योजनेचे नाव | योजनेचे ठिकाण / योजना राबविणारी यंत्रणा (PO/ATC/संस्था ) | सन २०१८-१९ करीता मंजूर निधी (रु.लाखात) | वितरीत करण्यात येणारा निधी (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|
| १२ | Anant Computing-Digital inclusion of tribal youth by teaching in vernacular coding language including NLP | Commissionerate/ Anant Computing/ Across Maharashtra | २००.०० | ४०.७९ |
| १३ | Improving quality of education through Activity Based learning and E- Learning in Ashram School (PO Aurangabad) | PO ITDP Aurangabad / GAS - Wadner, Brahmani, Hatti, Surudi, Shedala (Implementing through NGO) | २०.०० | ४.०८ |
| १४ | Montfort Social Institute- To form children's Parliament in all Ashram Schools | Commissionerate /Montfort Social Institute (Across Maharashtra) | ८५.०० | १७.३४ |
| १५ | Seegreen Solution with Eklavya Society and Commissioner TDD-Creating of master plan of EMRS for sustainable buildings, human resources and facilities (१८ EMRS). | Commissionerate/ Seegreen Solution | १०६.८५ | २१.७९ |
| १६ | SeeGreen Solution with ITDPs - Sensitization of students, teachers and staff of Ashramschools through workshops by engaging them in developing sustainable projects at their school. Beneficiaries:१०००० beneficiaries | Commissionerate/ Seegreen Solution | १२९.८८ | २६.४९ |
| १७ | Art India Foundation- Students of Government Ashram Schools get benefit of a vibrant platform for creative expression. (४.२ Cr for ३ Yrs, benefiting १L students) Beneficiaries:१००००० beneficiaries | Commissionerate/ Art India Foundation (In AS across Maharashtra) | १०५.०० | २१.४२ |
| १८ | Art India Foundation- Develop arts curriculum and training of teachers at Ashramschools (Covering ५० Ashram schools, training ५०० teachers) | Commissionerate/ Art India Foundation (In AS across Maharashtra) | ४९.५० | १०.१० |
| १९ | Eduisfun Technologies - Gamified Learning for Ashram School Students | Commissionerate/ Eduisfun/१६ EMRS | ४८.१० | ९.८१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | Providing Chapati Machine ( Roti /Chapati Maker) in Govt. Ashram School (PO ITDP Kinwat) | PO-ITDP Kinvat/AS Bodhadi, Patoda, Sarkhani, Jaladhara, Sahastrkund | ३०.१५ | ६.१५ |
| २१ | Serve Happiness Foundation- Narmada Prerna Yatra, ४ days journey to narmada region. (५० students) | Serve Happiness Foundation/Commissionerate | ५.०० | १.०२ |
| २२ | Recurring cost for EMRS students | Eklavya Society | ४३२०.६७ | ८८१.२६ |
| २३ | National Small Holder Poultry Development Trust - (~४००० beneficiaries;vidarbha) | Commissionerate/NSPDT/ Vidarbha Region | ५००.०० | १०१.९८ |
| २४ | BAIF -Seed Bank for indegenious seed conservation, production, marketing and sale (PO ITDP Rajur) | PO ITDP Rajur/BAIF/Akole Block, २० Villages | ५०.७५ | १०.३५ |
| २५ | Quest - Centre for Innovation, Planning and Evaluation. To conduct analysis on existing policy, provide research inputs and for monitoring and evaluation of projects undertaken by TDD | TRTI | ३००.०० | ६१.१९ |
| २६ | Gadchiroli District Sports Complex- A complex with gallery for २००० people, ४००m running track, multipurpose hall for indoor sports and other vital facilities. Collector office, Gadchiroli | PO ITDP Gadchiroli/Collector office Gadchiroli | ४५७.५० | ९३.३१ |
| २७ | Pragati Abhiyan :Revival of Millets - Finger Millets in PESA areas for better nutrition security, income enhancement and support climate resilient activity for tribal families. | Commissionerate/PO ITDP Nashik,Kalwan,Shahapur, Jawhar/Pragati Abhiyan | ४२.१९ | ८.६१ |
| २८ | Pragati Abhiyan: To increase yields by comprehensive millets revival, and to include primary processing units for young entrepreneurs; capacity building for various recipes that can be included in ICDS, MDM and Ashram Shala. | Commissionerate/ PO ITDP Nashik,Kalwan,Shahapur, Jawhar /Pragati Abhiyan | १३५.०० | २७.५३ |
| २९ | Providing heat pump water heater for bathing facilities for student in government ashram school (PO ITDP Dhule) and EMRS | PO ITDP Dhule | ६४.०० | १३.०५ |
| ३० | Monitoring and Evaluation(२% of sanctioned schemes) | Commissionerate/TRTI | २९८.६७ | ६०.९२ |
| | **Total (Committed+New Projects)** | | **१५१८४.२९** | **३०९७.०३** |

२.	उपरोक्त रू.३०९७.०३ लक्ष (रु. तीस कोटी सत्याणव लक्ष तीन हजार फक्त) खर्च मागणी मागणी क्र. टी-५, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागसवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, (०२) (४३) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अन्वये केंद्रीय सहाय्य (केंद्र योजना), ३१-सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर) (२२२५ E०३३) यामधील सन २०१९-२० करिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या निधीतून करण्यात यावा.

३.	सदर निधी अर्थसंकल्पिय अंदाज वितरण व संनियंत्रण प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आला आहे. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी वितरीत निधीच्या मर्यादेत निधी तातडीने आहरीत करण्याची दक्षता घ्यावी व संबंधित अपर आयुक्त,आदिवासी विकास / प्रकल्प अधिकारी ,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प /योजना अंमलबजावणी करणारी यंत्रणा यांना वितरित करावा.

४.	सन २०१९-२० या वर्षामधील केंद्र शासनाकडुन संदर्भ क्र.१ कडील पत्रान्वये मंजुर योजनांपेकी अ.क्र.१ व ३ वरील योजनांची मार्गदर्शक तत्वे शासन स्तरावरुन निर्गमित करण्यात आलेली आहेत. अ.क्र.५,६,७,८,९,१०,११,१२,१४,१५,१६,१७,१८,१९,२१,२२,२३,२५,२७ व २८वरील योजनांची मार्गदर्शक तत्वे शासन/आयुक्तालय/आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांच्या स्तरावरुन निर्गमित करण्यात येतील. उर्वरित योजनांसाठी अपर आयुक्त/प्रकल्प अधिकारी यांनी शासन निर्णय दि.२२.१२.२०१७ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार संबधित संस्थेशी समन्वय साधुन योजनेच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सुचना निर्गमित करुन रुपरेषा तयार करणे, लाभार्थी निश्चित करणे,मुल्यमापन व आढ़ावा घेणे इ. बाबींसाठी कार्यपद्धती निश्चित करावी.या योजनांसाठी प्रशासकीय मान्यता/मार्गदर्शक तत्वे निर्गमित करून योजनांची अंमलबजावणी तातडीने सुरु करण्याची जबाबदारी संबंधित अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांची राहील.

५.	केंद्र शासनाकडुन मंजुर सर्व योजनांचा मासिक प्रगती अहवाल संबंधित अपर आयुक्त/प्रकल्प अधिकारी यांच्याकडुन प्राप्त करुन घेवुन दरमहा १० तारखेच्या आत शासनास सादर करणे व कार्यान्वित असलेल्या योजनांसंदर्भात पुढील निधी संबंधितांना वितरित करण्यापुर्वी त्या योजनेचा आर्थिक व भौतिक प्रगती अहवाल व झालेल्या खर्चाबाबत उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी आयुक्त,आदिवासी विकास , नाशिक यांची राहील.

६.	ज्या योजना संबंधित प्रकल्प अधिका-यांच्या कार्यक्षेत्रात राबविल्या जातील त्या योजनांच्या लाभार्थ्यांची यादी व Geo-tagged Photographs हे www.stcmis.gov.in /smis या वेबसाईटवर व Central Assistance Scheme (CAS) पोर्टलवर अपलोड करावेत. प्रकल्प राबविल्याबाबतचा आवश्यक दस्ताऐवज संबंधित प्रकल्प अधिका-यांमार्फत ठेवण्यात येवून तो योग्य प्रकारे जतन केला जाईल याची दक्षता संबंधित प्रकल्प अधिकारी यांच्याकडून घेण्यात यावी व योजनांची कालबद्ध अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी संबंधित अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांची राहील.

७. या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेले अनुदान ज्या बाबींसाठी खर्च करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे, त्याच बाबींसाठी खर्च करावे व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता संबंधितांनी घ्यावी.

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २३१/अर्थोपाय, दिनांक २०/०६/२०१९ व क्र.२३३/अर्थोपाय,दि.२४.०६.२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२९१०५९४०४५२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Shivaji Jadhav

Digitally signed by Santosh Shivaji Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f635bf4a671627c02b82e6a01acb4a38afc24f58a5534a9d1271fe258a564b0, serialNumber=b8ee819ccc335cea98640b72c63671dd013899d3601f09ce4ea340e1741652a0, cn=Santosh Shivaji Jadhav
Date: 2019.06.29 11:06:56 +05'30'

**( संतोष जाधव )**
**कार्यासन अधिकारी**

**प्रत,**

१) मा. मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
५) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे
६) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
८) सहसचिव /उपसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
९) अपर आयुक्त,आदिवासी विकास,ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर.
१०) अवर सचिव, भारत सरकार, जनजाती कार्य मंत्रालय, शास्त्री भवन, नवी दिल्ली.
११) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२) सर्व प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
१३) नियोजन विभाग/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) अवर सचिव, का-६, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.